# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २०३- २३ दिनांक : - २७/०६/२०२३

## मोटार सायकल व कार चोरी करून विक्री करणाऱ्या सराईत आरोपीतांस अटक. काशिमीरा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत रहाणारे फिर्यादी नामे श्री. दिपक पुरण टम्माटा, वय- १९ वर्षे, रा. रुम नं. ३०३, सुंदर बिल्डींग, हनुमान मंदिर, मिरागांव, काशिमीरा, मिरारोड यांनी त्यांच्या मालकीची ४५,०००/- रुपये किंमत सुझुकी कंपनीची ऐक्सेस १२५ मोटार स्कूटी दिनांक १४/०४/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वा चे सुमारास प्लेझंट पार्क बस स्टॉपच्या जवळ मोकळया जागेत पार्क केली असता कोणीतरी अज्ञात इसमाने सदरची स्कुटी मोटार सायकल फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरल्याबाबत तक्र ार प्राप्त झाल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गु.रजि.नं. २८६/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये दिनांक १६/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात चोरीस गेलेली मोटार स्कूटी व अज्ञात अरोपीताचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी काशिमीरा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. निखील चव्हाण व पथक यांस मागदर्शन व सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वर नमुद पथक यांनी घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाची तसेच आजूबाजूला असलेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजची व इतर माहिती संकलित करुन आरोपी निष्पन्न केले. सदर गुन्हा करणारा पाहिजे आरोपी हे वेळोवेळी मोबाईल क्रमांक बदलून स्वत:चे अस्तित्व लपवून रहात होता. काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणातुन प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी क्रमांक १) टिगन आयरीस अल्वारीस, वय २८ वर्षे, रा. मरीना एन्क्लेव, जनकल्याण नगर, मालाड पश्चिम, मुंबई, २) आरीफ असिम शेख, वय ३१ वर्षे, रा. हनुमान गल्ली, भगतसिंग नगर, न्यु लिंक रोड, गोरेगांव पश्चिम, मुंबई यांना नमूद गुन्हयात स्पेस होम ए.सी. डॉर्मेट्री, बोरीवली पूर्व, मुंबई येथून ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमूद अटक आरोपीतांकडून वर नमुद गुन्हयात चोरीस गेलेली मोटार स्कूटी व कामिशीरा पोलीस ठाणे गुन्हा. रजि. क्र. ८२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ या गुन्हयात चोरीस गेलेली हुंडाई कंपनीची क्रेटा मोटार कार हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी नं. १ याचे विरुध्द १) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय, २) मुंबई शहर पोलीस आयुक्तालय, ३) ठाणे शहर पोलीस आयुक्तालय येथील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकुण २० व अरोपीत नं. २ याचे विरुध्द मुंबई शहर पोलीस आयुक्तालयात ०३ गुन्हे दाखल असुन नमुद अरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

यातील अटक आरोपीत नं. १ हा  मुंबई शहर पोलीस आयुक्तालयातील डी.एन. नगर, बोरीवली, एमएचबी कॉलनी, दिंडोशी, चेंबुर, समता नगर पोलीस ठाण्यांत पाहिजे आरोपीत असल्याचे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड, श्री. महेश तरडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संदीप कदम, पो.नि. श्री. कुमारगौरव धादवड (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. निखील चव्हाण, पो.हवा. दिपक वारे, सतीश निकम, अक्षय पाटील, पो.ना. राहुल वाळुंज, पो.अंम. किरण विरकर, राजेंद्र सूर्यवंशी तसेच  पो.हवा. जयप्रकाश जाधव, नेम. परिमंडळ ०१, मिरारोड यांचे कार्यालय यांनी केली आहे.

*********